वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./८८६८/२०२३ दिनांक :- ६/१२/२०२३

पुणे शहरातील चतुःश्रृंगी वाहतुक विभागाचे हद्दीत आय.टी.आय. रोड येथे २४ तास पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईनचे काम सुरु असून सदरचे कामाअंतर्गत आय.टी.आय. रोडचे मध्यभागी पाईप टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. सदरचे काम सुरु असताना या परिसरातील वाहतूक सुरळीत राहणेकरीता आय.टी.आय. रोडवरील वाहतूकीत बदल करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, चतुःश्रृंगी वाहतूक विभागातील वाहतूकीत दि. ०५/१२/२०२३ ते १९/१२/२०२३ रोजी दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

## चतु:श्रृंगी वाहतूक विभागाअंतर्गत

❖ **आय.टी.आय. रोडवरील हॉटेल सर्जा ते टायटन शोरुम या दरम्यानची परिहार चौकाकडे जाणारी वाहतूक दि. ०६/१२/२०२३ ते १९/१२/२०२३ रोजीपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात वळविण्यात येत आहे.**

✓ **पर्यायी मार्ग :-**

- बाणेर फाटा येथुन परिहार चौकाकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी बाणेर फाटा, हॉटेल सर्जा, डावीकडे वळण घेवून सिजन्स रोडने पुढे ईश्वर मेडीकल येथून उजवीकडे वळण घेवून अविक पॉलिकेम येथुन उजवीकडे वळण घेवून सरळ आयटीआय रोडने परिहार चौकाकडे जावे.
- परिहार चौकाकडून बाणेर फाट्याकडे जाणाऱ्या वाहतूकीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर